मुस्लिम पर्सनल लॉ

धार्मिक आणि सामुदायिक दृष्टिकोनातून

लेखक

मौलाना सदरूद्दीन इस्लाही

अनुवाद

हुसेन खान चाँद खान पठाण

"अल्लाहच्या नावाने, जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

कायद्याची आवश्यकता आणि आशय :

कायदा मानवी जीवनाच्या कोणत्याही विभागाशी संबंधीत असो, मानव आणि मानवी सभ्यतेसाठी त्याची आवश्यकता महत्त्वाची असते. त्याच्या अभावी मानवाचे श्रेष्ठत्व कायम राहू शकत नाही आणि सभ्यतेचे अस्तित्वही शिल्लक राहू शकत नाही. कायद्यामुळे मानवी समूहाचे समाजामध्ये रूपांतर होते. कायद्यामुळे लोकांच्या अधिकाराचे संरक्षण होते आणि सामूहिक जीवनास शक्ती प्राप्त होते. अत्याचार आणि समाजविघातक दुष्कृत्यामुळे होणाऱ्या विनाशापासून समाजाला कायद्यामुळे संरक्षण मिळते, न्याय आणि शांती लाभते. मानवी सभ्यतेच्या वृद्धीस कायद्यामुळे संधी प्राप्त होते. कायद्याची पकड जर नसेल तर सर्वत्र अराजक पसरेल. म्हणून कायद्याचे अस्तित्व आणि कायदाविषयक संस्थांची स्थापना या समाजाची अपरिहार्यता आहेत.

चांगल्या कायद्याची मौलिक वैशिष्ट्ये :

चांगल्या कायद्यासाठी दोन वैशिष्ट्यांची जरूरी असते–

१) ज्या समाजासाठी कायद्याची निर्मिती झाली आहे आणि ज्या कायद्याची बंधने समाजाने स्वीकारली आहेत, तो कायदा समाजाच्या प्रगतीचे आणि यशाचे खरे साधन बनले पाहिजे. कायद्याचा हा उद्देश सफल न करणारा एखादा कायदा एखाद्या समाजावर लागू केल्यास समाजाचा त्याग व्यर्थ जाईल आणि तथाकथित कायदा अंमलात आणण्याचे कोणतेही कारण शिल्लक राहणार नाही आणि अशा कायद्याला समाजासाठी योग्य समजले जाऊ नये.

२) समाजाच्या मौलिक विचारांशी आणि धारणांशी अशा कायद्यात फारकत घेतलेली नसावी. समाजाच्या भावना आणि सांस्कृतिक मूल्ये प्रस्तुत कायद्यात प्रतिबिंबित झाली पाहिजेत. ज्या समाजावर एखादा कायदा लागू केला जाईल तो कायदा त्या समाजास मानसिकरित्या स्वीकारार्ह असला पाहिजे. त्या कायद्यात समाजाच्या सन्मानाची भावना असावी आणि अशा कायद्याची बंधने आनंदाने स्वीकारण्यास तो समाज तयार असावा. कायद्यास नापसंत ओझे समजले जाऊ नये, त्याला डोक्यावरून फेकून देण्याचा प्रयत्न केला जाऊ नये. कायद्यातून सुटण्यासाठी पळवाटा शोधण्याचा प्रयत्न केला जाऊ नये. तर्क आणि अनुभवानुसार कायद्याचे हे वैशिष्ट्य तेव्हाच निर्माण होऊ शकते आणि समाजात त्यास तेव्हाच व्यावहारिक स्थान प्राप्त होऊ शकते, जेव्हा त्या कायद्यात सामाजिक सिद्धान्त आणि मूल्यांचा आत्मा समाविष्ट झालेला असेल आणि त्या कायद्याची मुळे त्या समाजाच्या विचारांशी आणि भावनांशी जुळलेली असतील.

उपरोल्लेखित पहिल्या वैशिष्ट्यापेक्षा दुसरे वैशिष्ट्य अधिक महत्त्वपूर्ण आणि योग्यच नव्हे, तर तोच त्याचा पायासुद्धा आहे असे विचारांती दिसून येईल. कारण कोणताही कायदा, साफल्य आणि प्रगतीचे खरे साधन तोपर्यंत कदापि सिद्ध होऊ शकत नाही, जोपर्यंत तो कायदा समाजाची जीवनमूल्ये आणि सिद्धान्त, विचारधारा आणि भावना विचारात घेऊन केलेला नसेल. समाजाची

जीवनमूल्ये आणि सिद्धान्त यावर कायद्याचा पाया रचण्याची कायद्याची पहिली आणि अंतिम आवश्यकता असते. त्याशिवाय तो एक चांगला आणि यशस्वी कायदा होऊ शकत नाही. अशा कायद्याने समाजाचे कल्याण होत नाही किंवा समाज यशस्वी होत नाही. जेव्हा हे सर्व काही होऊ शकत नाही तर अशा कायद्यास लोकांच्या माथी मारण्याचा कोणताही अधिकार कोणाला पोहचत नाही. असा तथाकथित कायदा एखाद्या समाजाने स्वत:हून बनविला तर वास्तविकता त्या समाजाची सांस्कृतिक आत्महत्या होईल आणि दुसऱ्या एखाद्या शक्तीने असा कायदा समाजाच्या माथी मारला तर त्या समाजाची सांस्कृतिक हत्या होईल.

'मुस्लिम पर्सनल लॉ' कोणत्या प्रकारचा कायदा आहे? :

कायद्याच्या बाबतीत या महत्त्वाच्या सैध्दान्तिक वास्तवतेला दृष्टीसमोर ठेवा आणि नंतरच त्या कायद्याची बाब समोर घ्या, ज्याला मुस्लिम पर्सनल लॉ (मुस्लिम व्यक्तिगत कायदा) म्हणतात. हा कायदा मुस्लिमांचा व्यक्तिगत कायदा असल्यामुळे याचा अर्थ निश्चित होईल की मुस्लिमांच्या सामुदायिक आणि सामाजिक वैशिष्ट्यांशी त्याचा निकटचा संबंध आहे, त्यांच्या विशिष्ट विचारसरणी आणि धारणांचे ते लक्ष्य आहे, त्यांचे सिद्धान्त आणि मूल्यांचे चित्र आहे. तसे नसते तर तो अस्तित्वात येण्याची शक्यता नव्हती. १४०० वर्षापेक्षा अधिक कालावधीपर्यंत त्यांच्यावर लागू झाला नसता. म्हणून या कायद्यासंबंधी बोलणे, चर्चा करणे आणि विचारविनिमय करण्याचा अधिकार प्राप्त करण्यापूर्वी मुस्लिमांच्या विशिष्ट विचार आणि धारणांचे पूर्ण परीक्षण करून या कायद्याचा स्रोत निश्चित करणे आवश्यक आहे. मुस्लिम समाज कोणत्याही एका भौगोलिक, वांशिक, भाषिक किंवा अशाच कोणत्या एका बाबीवर आधारित समाज नसून तो पूर्णपणे सैद्धान्तिक आणि विशिष्ट मूल्यांवर आधारित आहे. ही वस्तुस्थिती समोर ठेवल्यास दोन पर्याय संभवनीय आहेत -

१) 'मुस्लिम पर्सनल लॉ'चा पाया बनलेला मुस्लिमांचा विशिष्ट स्वभाव, त्यांचे विशिष्ट विचार आणि दृष्टिकोन हे त्यांच्या केवळ सामाजिक जीवनाच्या विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीमुळे आणि सामाजिक आवश्यकतेनुसार निर्माण झाले असावेत.

२) त्यांची मूळ सैद्धान्तिक मूल्ये आणि तात्त्विक प्रतिष्ठेच्या परिणामातून 'मुस्लिम पर्सनल लॉ'ची निर्मिती झाली असावी.

जगामध्ये दोन्ही प्रकारचे व्यक्तिगत कायदे आढळतात. काही समाजाचे व्यक्तिगत कायदे वरील पहिल्या पर्यायानुसार तर काहीचे दुसऱ्या पर्यायानुसार असल्याचे दिसून येते.

'मुस्लिम पर्सनल लॉ' पहिल्यानुसार असेल तर त्यामुळे मुस्लिमांच्या वेगळेपणास आणि त्यांच्या सामुदायिक व्यक्तिमत्वास महत्त्व प्राप्त होते. म्हणून त्यांच्या केवळ रूढी, परंपरा, रितीरिवाज आणि त्यांच्या समजुतीनुसार तो कायद्यांचा संग्रह तयार झाला असावा आणि म्हणून तो आता ऐतिहासिक म्हणून त्यांच्या जीवनपद्धतीचा भाग बनला आहे.

'मुस्लिम पर्सनल लॉ' वरील दुसऱ्या पर्यायानुसार असेल तर याचा अर्थ असा होईल की या कायद्याचा संबंध थेट त्यांच्या धार्मिक श्रद्धेशी आणि त्यांच्या जीवनमूल्याशी जोडलेला आहे आणि

तोसुद्धा शरियतचा (इस्लामी कायद्याचा) एक भाग असल्यामुळे म्हणजे मुस्लिम असणे आणि मुस्लिम धर्माशी असलेली एकनिष्ठता कायम ठेवणे असेल. वेगळ्या शब्दांत सांगायाचे तर हा कायदा वास्तविक मुस्लिम समाजाने बनविलेला नाही इतकेच नव्हे तर हे कायदे स्वत: इस्लाम धर्माने बनविले आहेत. या कायद्याला समजून घेण्यासाठी आणि त्यावर भाष्य करण्यासाठी त्याचे उगमस्थान समजून घेणे आवश्यक होते. शिवाय हा कायदा पहिल्या पर्यायानुसार आहे की दुसऱ्या पर्यायानुसार आहे हे ठरविण्याची आवश्यकता आहे. कारण जोपर्यंत या प्रश्नाचे उत्तर ज्ञात होत नाही आणि या कायद्याचा वास्तविक दर्जा निश्चित होत नाही तोपर्यंत याविषयी कोणतीही उचित चर्चा किंवा संवाद घडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तरीसुद्धा चर्चा केली गेली तर ती वस्तुस्थितीवर, योग्य ज्ञानावर आणि प्रामाणिक नसेल. म्हणून या मौलिक वास्तवतेचा शोध करून ते निश्चित करण्यात यावे जेणेकरून चर्चा योग्य मार्गाने पुढे जाऊ शकेल.

शोध घेण्याची योग्य पद्धत :

शोध आणि संशोधनाची योग्य आणि यथार्थ पद्धत एकच असेल याबाबतीत दुमत होऊ शकत नाही आणि ती पद्धत म्हणजे मुस्लिम ज्या धर्माचे पालन करतात त्याचाच अभ्यास केला जावा. 'मुस्लिम पर्सनल लॉ'चे अस्सल उगमस्थान पवित्र कुरआन आणि हदीस यांचा खुल्या मनाने अभ्यास केला जावा आणि पाहिले जावे की ज्याला 'मुस्लिम पर्सनल लॉ' म्हणतात त्याचे अस्तित्व त्यांच्या पृष्ठांत आहे किंवा नाही? ते असेल तर त्याचा दर्जा काय आहे आणि त्यांचे महत्त्व काय आहे?

पवित्र कुरआन आणि हदीसमध्ये या कायद्याचा संबंध अजीबातच नसेल तर त्याला कोणताही धार्मिक दर्जा नाही याचा तो पुरावा असेल आणि त्याचे जे महत्त्व आहे ते फक्त सामाजिक आणि सांस्कृतिक दर्जाचे आहे असे सिद्ध होईल.

आणि जर स्थिती दुसरी दिसून आली तर वस्तुस्थिती दुसरी निश्चित होईल आणि कायद्याचा दर्जा धार्मिक आणि शरियतचा मानणे आवश्यक होईल.

'मुस्लिम पर्सनल लॉ'शी संबंधित प्रमाणित तथ्ये

आता पवित्र कुरआन आणि सुन्नत यांच्या निरीक्षणाचा संबंध जेथपर्यंत आहे त्याच्या परिणामस्वरूप खालीलप्रमाणे स्पष्ट तथ्ये दिसून येतात.

१. पवित्र कुरआन आणि सुन्नत (पैगंबराचरण) यांचे महत्त्व :

सर्वात पहिली वस्तुस्थिती ही आहे की मुस्लिमांचे कौटुंबिक जीवन आणि दुसऱ्या व्यक्तिगत बाबीसंबंधी पवित्र कुरआन व हदीसमध्ये उपदेश, मार्गदर्शन आणि आदेश अस्तित्वात आहेत. इतकेच नव्हे तर ते परिपूर्ण स्पष्टीकरणासह उपलब्ध आहेत. म्हणून पवित्र कुरआन आणि हदीस यांची पृष्ठे उलटत जावीत आणि या उपदेश, मार्गदर्शन आणि आदेशांचे व्यवस्थित अध्ययन करीत जावे. निकाह (विवाह), महर (नवऱ्या मुलाकडून नवरी मुलीला दिली जाणारी रक़म किंवा वस्तू), नफ़क़ा (पत्नी व मुलासाठी अन्नवस्त्र), तलाक (पतीने पत्नीला दिलेला घटस्फोट), खुलअ (पत्नीने पतीला

दिलेला घटस्फोट), इद्दत (घटस्फोटाआधीची मुदत), विरासत (वारसा), वसियत (वारसापत्र, मृत्युपत्र), इला, नसब, वक्फ़, हिबा इत्यादी समस्यांपैकी एकही समस्या अशी नाही ज्यासंबंधी चर्चा केली नाही, आदेश दिले नाहीत, मूल्ये आणि कायदा निश्चित केला नाही. या इतक्या उघड वास्तव बाबी आहेत की यासंबंधी पवित्र कुरआनातील संबंधित आयतींचा आणि हदीसांचा हवाला देण्याची अजिबात आवश्यकता नाही. इच्छुक व्यक्ती पवित्र कुरआनच्या कोणत्याही अनुवादावर नजर फिरवून त्यांची सत्यता पडताळू शकतो.

'मुस्लिम पर्सनल लॉ' पवित्र कुरआन आणि हदीसमध्ये निश्चित स्पष्टीकरणासह आहे. जीवनाच्या कोणत्याही पैलूविषयी केलेल्या वर्णनापेक्षा अधिक विस्ताराने या कायद्यांचे वर्णन पवित्र कुरआन व हदीसमध्ये करण्यात आले आहे. नमाज, जकात, रोजा आणि हज यासारख्या मौलिक धार्मिक कार्याविषयीसुद्धा अशा व्याख्या केलेल्या नाहीत. कोणत्याही हिताशिवाय आणि आवश्यकतेशिवाय असे होऊ शकत नाही. हित आणि आवश्यकतेच्या निश्चितीकरणात मतभिन्नता होऊ शकते. तथापि व्यक्तिगत कायद्यांच्या विवरणामध्ये वैशिष्ट्यपूर्ण व्याख्या देण्यात आल्यामुळे पवित्र कुरआनच्या दृष्टीत त्यांना खास महत्त्व असल्याच्या पुराव्याबाबत दुमत होऊ शकत नाही.

२. अल्लाहचे आदेश असल्याचे स्पष्टीकरण :

कोणत्याही आदेशांचा उल्लेख पवित्र कुरआन आणि हदीसमध्ये असल्यास ते आदेश पाळणे मुस्लिमांना बंधनकारक असते हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. म्हणून ज्यासंबंधी वादविवाद केला जात आहे, तो व्यक्तिगत कायदा पवित्र कुरआन आणि हदीसमध्ये अस्तित्वात असल्यामुळे त्या कायद्याचे मुस्लिमांना अनुसरण करणे अनिवार्य आहे. या सैद्धान्तिक वास्तवतेवर विसंबवून पवित्र कुरआन या कायद्याचे केवळ विवेचन करून थांबत नाही तर प्रत्येक स्तरावर त्याचे पालन करणे कसे बंधनकारक आणि आवश्यक आहे तेही सांगितले आहे. उदाहरणार्थ, लग्नविधी (निकाह) संबंधी काही आदेश दिल्यानंतर एके ठिकाणी ताकीद केली आहे,

"हा अल्लाहचा कायदा आहे ज्याचे पालन तुमच्यावर बंधनकारक आहे"

(दिव्य कुरआन, ४ : २४)

आणखी एका ठिकाणी आदेश दिला आहे,

"ही अल्लाहची आज्ञा आहे. तो तुमच्या दरम्यान निर्णय देतो."

(दिव्य कुरआन, ६० : १०)

याप्रमाणे तलाक आणि खुलअ यासंबंधी काही आदेशांचे विवेचन करून सावधान केले जाते,

"या अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादा आहेत त्यांचे उलंघन करू नका"

(दिव्य कुरआन, २ : २२९)

इद्दतविषयी काही सूचना देऊन आठवण करून दिली जाते,

"ही अल्लाहची आज्ञा आहे जी त्याने तुमच्याकडे अवतरली आहे."

(दिव्य कुरआन, ६५ : ५)

आणखी एके ठिकाणी तलाक आणि इद्दत याविषयी काही आदेश देऊन त्यांना 'हुदुल्लाह' (अल्लाहने निर्धारित केलेल्या मर्यादा) असे म्हणून त्यांची ओळख करून देण्यात आली आहे.

वारसाहक्काच्या कायद्यासंबंधी तर व्याख्या अगदी स्पष्ट करून त्याचे विवेचन करताना सर्वांत प्रथम त्यातच नि:संदिग्ध हुकूम दिला आहे,

"आई-वडील आणि जवळच्या नातेवाईकांनी मागे ठेवली असेल आणि स्त्रियांसाठीही त्या संपत्तीत वाटा आहे जी आई-वडील आणि जवळच्या नातेवाईकांनी मागे ठेवली असेल, मग ती कमी असो अथवा जास्त, हा वाटा (अल्लाहकडून) ठरविलेला आहे."

(दिव्य कुरआन, ४ : ७)

नंतर या कायद्याच्या विवेचनाची सुरवात खालील शब्दांनी होते,

"तुमच्या संततीविषयी अल्लाह तुम्हाला आदेश देत आहे. " *(दिव्य कुरआन, ४ : ११)*

(म्हणजे वारसदारासाठी अल्लाहनेच वारसापत्र केले आहे, कुणा व्यक्तीने ते करून ठेवण्याची आवश्यकता नाही.)

यानंतर याच कायद्याच्या एका विभागाचे विवेचनपूर्ण होण्यापूर्वी मध्येच थांबून आठवण करून दिली जाते,

"हे हिस्से अल्लाहने ठरवून दिलेले आहेत आणि अल्लाह नि:संशय सर्व हकीगती जाणणारा आणि सर्व गर्भित हेतू जाणणारा आहे." *(दिव्य कुरआन, ४ : ११)*

आणि पुन्हा या विवेचनाची समाप्ती खालील शब्दांनी होते,

"हा आदेश अल्लाहचा असून अल्लाह ज्ञाता, द्रष्टा व सहनशील आहे. या अल्लाहने ठरवून दिलेल्या मर्यादा आहेत " *(दिव्य कुरआन, ४ : १२-१३)*

याप्रमाणे या वारसाहक्काबाबत शब्द आणि शैली बदलून केवळ एक दोन वेळाच नव्हे तर पाच वेळा खंबीरपणे हे वास्तव सांगून मनावर ठसविले आहे की हे कायदे अल्लाहने निश्चित केलेले असून यांचे पालन करणे अनिवार्य ठरविले आहे.

पवित्र कुरआनमध्ये असलेल्या या नि:संदिग्ध आदेशामुळे हे कायदे कोणत्याही परिस्थितीत अनावश्यक होऊ शकतील, हा विचार कोणत्याही अनुचित युक्तिवादानेसुद्धा योग्य ठरवू शकत नाही आणि या कायद्यांना आपण बनविलेल्या कायद्याच्या पातळीवर आणता येत नाही.

३. इस्लामी मूल्यांचे निर्देशक :

हे कायदे इस्लामच्या मूळ मूल्यांचे आणि उद्देशांचे पोषक आणि संरक्षक असून त्यात धर्माचा पाया असलेल्या मूल्यांचा आत्मा अस्तित्वात आहे. म्हणून हे कायदे मुस्लिमांच्या वैयक्तिक आयुष्यातील समस्यांना व्यवस्थित सोडविण्याचे साधन आहेत. याशिवाय श्रद्धेची

आणि इस्लामी मूल्यांची जपणूक करणाऱ्या आवश्यक बाबी एकत्रित ठेवण्याची साधनेही त्या कायद्यात आहेत. उदाहरणार्थ, अनेकेश्वरवाद्याशी विवाह करता येत नाही, असा एक पायाभूत इस्लामी कायदा आहे. कारण हा कायदा मोडणारी व्यक्ती श्रद्धा (ईमान), इस्लामी संस्कार आणि पारलौकिक जीवनातील सफलता यांना पारखी होण्याची सबब बनू शकते, असे पवित्र कुरआनात (सूरह बकरा) सांगितले आहे.

अढळ श्रद्धेची संपत्ती ही मुस्लिमाकरिता सर्वाधिक मौल्यवान बाब असते आणि पारलौकिक जीवनाची सफलता हा तिचा वास्तविक उद्देश असतो आणि त्या बाबीचे संरक्षण करण्यासाठी अनेकेश्वरवाद्याशी विवाहास प्रतिबंध करणे हा इस्लामचा असलेला मौलिक सिद्धान्त योग्य आणि आवश्यक ठरतो.

त्याचप्रमाणे सर्व पत्नींशी न्यायाने वागण्याच्या अटीसह एकापेक्षा अधिक विवाहांस अनुमती दिलेली आहे. (सूरह निसा) त्यास बंदी घातलेली नाही. ही अनुमती अनेक सामाजिक आणि नैतिक कल्याणासाठी दिलेली आहे आणि त्यात सर्वांत महत्त्वाचा आणि मुख्य उद्देश अनाथांच्या संरक्षणाचा आहे.

घटस्फोटाचे आणखी एक उदाहरण घ्या. इस्लामने वैवाहिक नात्याला अतिमहत्त्वाचे आणि आदरणीय ठरविले असले तरी तलाक आणि खुलअ यांचीही मुभा ठेवली आहे. (सूरह बकरा : आयत २२९) अल्लाहच्या मर्यादांचे उल्लंघन करण्यापासून वाचविणे हा त्यामागे उद्देश्य आहे.

आपापसांतील घृणा, तिरस्कार आणि उदासीनतेमुळे दांपत्य जीवनातील उद्देशच जर दोघांच्या नजरेतून अदृष्य झाला असेल आणि समेटाची अजिबात आशा उरलेली नसेल तर असे नाते टिकवून ठेवणे म्हणजे आपल्या चारित्र्यावर कलंक लावणे आणि अल्लाहने दांम्पत्यातील प्रत्येकाला दिलेली कर्तव्ये आणि अधिकार यांना हरताळ फासत राहणे म्हणजे उघड उघड सामाजिक वितंडवाद असेल. तथापि इस्लाम हा जीवनाच्या कोणत्याही स्तरावर वितंडवाद, तंटेबखेडे अजिबात पसंद करीत नाही. असे वितंडवाद आणि तंटेबखेडे थांबविण्यासाठी पती-पत्नीला वेगळे होण्याशिवाय कोणतीही शक्यता उरत नाही. म्हणून तलाक आणि खुलअची परवानगी देणे आवश्यक समजले गेले आहे.

इस्लामचे व्यक्तिगत कायदे हे केवळ कायदेच नसून त्यांच्या साहाय्याने अपेक्षित मानवी मूल्ये स्थापित करण्यात यावीत असा उद्देश या कायद्यात आहे. हे वरील उदाहरणावरून सहज लक्षात येईल.

४. धर्मावरील दृढ श्रद्धेकरिता आणि मोक्षाकरिता अटी :

उपरोल्लेखित कायदे अंमलात आणणे इस्लाम धर्मावरील दृढ श्रद्धेसाठी आणि मोक्षासाठी अनिवार्य अटी आहेत हे पवित्र कुरआनच्या शिकवणीने स्पष्ट होते. या वास्तवाला प्रत्यक्ष स्पष्टीकरणाची गरज नाही. कारण अल्लाहचा ग्रंथ आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हदीसमध्ये या कायद्याचे अस्तित्व असणे म्हणजे ते प्रत्येक मुस्लिमाने अंमलात आणणे अढळ

श्रद्धा आणि इस्लामसाठी आवश्यक आणि पुरेसे आहे.

याबाबतीत पवित्र कुरआनची शिकवण पाहणे योग्य ठरेल. हे आदेश दृढ श्रद्धेच्या वचनबद्धतेसाठी आवश्यक असून धर्मनिष्ठेचा अविभाज्य अंग आहे. त्यांचे उल्लंघन करणे जुलूम, पाप-परायणता, नास्तिकता असून ईशशिक्षेस कारणीभूत आहे. म्हणून वारसाहक्कासंबंदीच्या कायद्याचे वर्णन केल्यानंतर खालील आज्ञा होते,

''या अल्लाहने ठरवून दिलेल्या मर्यादा आहेत. जो अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन करील त्याला अल्लाह अशा उपवनांत दाखल करील ज्यांच्या खालून कालवे वहात असतील आणि त्या उद्यानात तो सदैव राहील व हे तर मोठे यश होय आणि जो अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवज्ञा करील आणि त्याने ठरविलेल्या मर्यादांचे उल्लंघन करील, त्याला अल्लाह आगीत टाकील ज्याच्यात तो सदैव राहील त्याच्यासाठी अपमानकारक शिक्षा आहे.''

(दिव्य कुरआन, ४ : १३-१४)

वारसाहक्कासंबंधी पवित्र कुरआनने दिलेल्या आज्ञांच्या पालनाचे फळ मृत्यूनंतरच्या निरंतर जीवनाचे साफल्य आणि आज्ञांच्या उल्लंघनाचा परिणाम मृत्यूनंतरच्या कायमच्या जीवनात अपयश पदरी पडेल, अशी आज्ञा या गोष्टींची स्पष्ट घोषणा अल्लाह करीत आहे.

त्याचप्रमाणे घटस्फोटाचे काही आदेश दिल्यानंतर अशी आज्ञा केली जाते,

''तुम्हाला उपदेश देण्यात येत आहे की असे कृत्य मुळीच करू नका जर तुम्ही अल्लाह आणि अंतिम दिनावर श्रद्धा ठेवणारे असाल.'' *(दिव्य कुरआन, २ : २३२)*

हे आदेश अंमलात आणणे आणि मुस्लिम असणे या दोन्ही गोष्टी पवित्र कुरआनच्या दृष्टिकोनातून परस्परांना पूरक आहेत असा याचा अर्थ होतो.

'सूरह मुजादला'मध्ये 'ज़हार' (पत्नीला माता मानणे) संबंधीच्या आदेशांचे विवेचन केल्यानंतर त्यांचे महत्त्व खालील शब्दांत वर्णन करण्यात आले आहे,

''ही आज्ञा अशासाठी दिले जात आहे की तुम्ही अल्लाह व त्याच्या पैगंबरावर श्रद्धा ठेवावी. या अल्लाहने निश्चित केलेल्या मर्यादा होत आणि इन्कार करणाऱ्यांसाठी यातनादायक शिक्षा आहेत.'' *(दिव्य कुरआन, ५८ : ४)*

'व लिल काफिरीन अज़ाबुन अलीम' हे शब्द येथे आले असल्यामुळे पवित्र कुरआनचा उद्देश स्पष्ट दिसून येतो की वर विवेचन केलेल्या 'ज़हार'चे आदेश धुडकावून लावणारी व्यक्ती श्रद्धेच्या कक्षेत शिल्लक राहू शकत नाही.

धर्म श्रद्धेचा अविभाज्य अंग असण्याचा स्पष्ट पुरावा :

विवाह, घटस्फोट, पोटगी, वारसा इत्यादी बाबींसंबंधी पवित्र कुरआनात जे आदेश दिलेले आहेत त्यांचे स्पष्टीकरण पैगंबर मुहम्मद (स.) यांनी केलेले आहे. या स्पष्टीकरणास 'सुन्नत' असे म्हणतात. पवित्र कुरआन आणि सुन्नतचे आदेश जे व्यक्तीच्या आणि समाजाच्या जीवनाशी

संबंधित आहेत, ते आदेश इस्लाम धर्मशास्त्राचे (शरियतचे) अत्यंत महत्त्वाचे, अविभक्त आणि अविभाज्य असे अंग आहेत. विवाह, घटस्फोट, पोटगी, वारसा इ. बाबतीत पवित्र कुरआनने जे आदेश दिले आहेत त्या सर्वांना एकत्रितपणे शरियत म्हणतात आणि शरियतचे संपूर्णपणे पालन करण्याची आज्ञा पवित्र कुरआनने दिली आहे. या शरियतलाच 'मुस्लिम पर्सनल लॉ (मुस्लिम व्यक्तिगत कायदा)' असे सध्या संबोधण्यात येते.

'मुस्लिम पर्सनल लॉ' संबोधणे चुकीचे आहे :

तथाकथित 'मुस्लिम-मोहमिडन पर्सनल लॉ'मधील कायदे वास्तविक इस्लाम धर्माचा अविभाज्य भाग आहे ही हकीकत सिद्ध झाल्यामुळे इतर दुसऱ्या जमातीच्या व्यक्तिगत कायद्याहून त्याची हकीकत पूर्णपणे भिन्न आहे. इतर जमातीचे व्यक्तिगत कायदे त्यांनी स्वत:हून तयार केलेले आहेत. मुस्लिम कायद्याचा उगम मुस्लिमांची बुद्धी, समज, आवडनिवड किंवा त्यांचे विचार यातून झालेला नसून त्याचे उगमस्थान पवित्र कुरआन आणि सुन्नत आहे. म्हणून त्यांना मुस्लिम किंवा मोहमिडन पर्सनल लॉ (मुस्लिम-मोहमिडन व्यक्तिगत कायदा) म्हणणे त्या कायद्याच्या मूळ दर्जावर पडदा पाडणे आहे. वास्तविक या कायद्याला हे नाव ब्रिटिश राजकर्त्यांची कुत्सित आणि अशुभ देणगी आहे. ते नेहमी मुस्लिमांची संस्कृती, सभ्यता आणि धर्म यांना क्षति पोहोचवून त्यांच्या धारणांना नष्ट करण्याच्या प्रयत्नात असत. इस्लाम धर्माशी शत्रुत्व आणि इस्लाम धर्माच्या अनभिज्ञतेच्या विचारांच्या परिणतीमुळे या कायद्याला 'कुरआनिक लॉ' किंवा 'इस्लामिक लॉ' म्हणण्याऐवजी 'मोहमिडन लॉ' असे नामकरण करण्यात आले. कायद्याच्या पुस्तकातून आणि न्यायसंस्थेत हेच नाव प्रचलित केल्यामुळे खऱ्या वस्तुस्थितीची शंकासुद्धा येऊ नये अशी मखलाशी करून ठेवली आहे. मुस्लिमांच्या व्यक्तिगत जीवनाशी संबंधित असणाऱ्या शरियतच्या कायद्याला 'मुस्लिम पर्सनल लॉ' नाव दिले गेले. तथापि ते मुस्लिम कायदे नसून इस्लामी कायदे होते आणि आजही आहेत. म्हणून या कायद्यांना 'इस्लामी व्यक्तिगत कायदा । इस्लामिक पर्सनल लॉ' हे नाव देणे सत्य, वास्तवाला आणि प्रामाणिकपणाला धरून होईल. इस्लाम धर्माच्या अनभिज्ञतेची आज ही परिस्थिती आहे की सुशिक्षित लोकांनासुद्धा 'इस्लामी' आणि 'मुस्लिम' यातील फरक समजत नाही. अशा परिस्थितीत 'मुस्लिम पर्सनल लॉ'मध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू राहिल्यास त्याचा स्वाभाविक परिणाम असा होईल की, शरियतच्या आदेशांचे मूळ चित्र सर्वसामान्य लोकांना दिसू शकणार नाहीत. हा तर 'मुस्लिम पर्सनल लॉ' आहे, त्याच्याशी इस्लामचा काही संबंध नाही, असाच लोक विचार करतील. सर्व संबंध केवळ मुस्लिमांशी असून मुस्लिम नावाच्या समाजाचे तसेच सांस्कृतिक कायदे आहेत, जसे जगामध्ये बऱ्याच अन्य समाजाचे व्यक्तिगत कायदे असून त्यांच्या धर्माशी फारकत घेतलेले आणि केवळ सांस्कृतिक कायदे आहेत. इतका मोठा पायाभूत गैरसमज चालू ठेवणे आणि त्याचीच वृध्दी करत राहणे प्रामाणिक आणि न्यायसंगत आहे काय?

व्यक्तिगत कायदा इस्लाम धर्माचा अविभाज्य भाग आहे त्याची तर्कशुद्ध कारणमीमांसा

इस्लाम धर्माच्या शिकवणुकीचे क्षेत्र कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांपर्यंत विस्तारित पावले आहे. ही धारणा ज्या गोष्टींच्या परिणामस्वरूप निर्माण झाली आहे त्याची कारणे समजून घेणे प्रथम आवश्यक आहे. ही कारणे पवित्र कुरआनमधील मौलिक धारणामध्ये दिसून येतात. पवित्र कुरआनमध्ये अल्लाह, धर्म आणि उपासनेसंबंधी विवेचन करण्यात आले आहे. यातील धारणाशिवाय प्रत्येक धारणा चुकीची किंवा अज्ञानमूलक किंवा असत्य आहे. त्यासंबंधी आवश्यक स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

अल्लाहने सर्व सृष्टीला निर्माण केले आहे. तो सर्व सजीवांचा पालनकर्ता, ईशगुणांनी युक्त, न्याय करण्याची क्षमता, बुद्धिमत्ता, दया, शक्ती, ज्ञान इत्यादी वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. तो जसा सृष्टीचा निर्माता, पालनकर्ता तसाच त्याचा व्यवस्थापकही आहे. तो मालक आणि ईश्वरसुद्धा आहे. तो स्वामी आणि शासकही आहे. तो कायदा देणारासुद्धा आणि कायदा बनविणारासुध्दा आहे. तो उपास्य आणि रक्षकही आहे. त्याच्या या वैशिष्ट्यांमध्ये, या योग्यतामध्ये आणि त्याच्या या अधिकारामध्ये कोणीही सहभागी नाही. म्हणून आराधनायोग्य फक्त तोच आहे आणि आज्ञापालनाचा खरा अधिकारीसुद्धा तोच आहे.

अल्लाहच्या या उपदेशांचा, आदेशांचा आणि कायद्याच्या संग्रहाचे नाव धर्म (इस्लाम) आहे. सरळमार्ग दाखविण्यासाठी, सत्याच्या मार्गावर चालण्यास प्रवृत्त करण्यासाठी आणि खरी सफलता मिळवून देण्यासाठी आणि ठरलेल्या गंतव्यापर्यंत पोहोचण्यासाठी हा धर्म अल्लाहने मानवास प्रदान केला आहे. अल्लाह न्यायी, शासक, पालक आणि सर्वशक्तिमान असल्यामुळे त्याने मानवाला नैतिक, आध्यात्मिक आणि भौतिक जीवनासाठी सर्व काही उपलब्ध करून दिले आहे. अन्यथा त्याची बुद्धिमत्ता, शासन व्यर्थ सिद्ध झाले असते, ईश्वर म्हणवून घेण्याचा हक्क त्याला राहिला नसता. आपल्या जीवनाचा उद्देश आणि त्या उद्देशाच्या प्राप्तीसाठी, यथार्थ मार्गासाठी सावधान करण्याची मानवास अत्यंत आवश्यकता होती जेणेकरून भ्रम, दुष्ट बुध्दी आणि भावनांच्या काळोखात भरकटत न जाता जीवनाच्या उद्देशपूर्तीसाठी सरळमार्ग उपलब्ध व्हावा. धर्माचा (इस्लामचा) उद्देश आणि हेतूही हाच होता की ते मानवाच्या पूर्ण नैतिक जीवनाचे अधिष्ठान व्हावे शासक आणि सर्व मानवजातीचा ईश्वर असण्यासाठी त्याने मानवी जीवनाचे सर्व पैलू व्यापून टाकले आहेत. कोणताही पैलू त्याच्या आवाक्याबाहेर नाही. मानवी जीवनातील कोणत्याही बाबी किंवा व्यवहाराच्या नैतिक बाजूसंबंधी चांगल्या व वाईट गोष्टींची चर्चा उद्‌भवू शकते. म्हणून अल्लाहकडून कोणत्याही बाबीसंबंधी उपदेश आणि मार्गदर्शनास मानव वंचित राहता कामा नये. म्हणून अल्लाहचा हा अंतिम धर्म म्हणजे इस्लाम एक एक करून सर्व समस्यांवर चर्चा करतो. उपासनागृहापासून सामुदायिक जीवनाच्या शेवटच्या टोकापर्यंत प्रत्येक बाबीसंबंधी उपदेश करतो. या सर्व उपदेशांच्या सर्वसमावेशक संग्रहाचे नाव इस्लाम धर्म (परिपूर्ण जीवनपद्धती) आहे आणि त्याची प्रत्येक बाब धर्माचा अंश असते.

इस्लामच्या दृष्टीने पूजा, उपासना, आराधना आणि तपस्या यांच्यापेक्षा 'इबादत' खूप विकसित आहे. ईश्वराची आराधना आणि त्याचे स्मरण हा भक्तीचा प्राण आहे, परंतु परिपूर्ण भक्ती नाही. इस्लामनुसार, अल्लाहने दिलेल्या संपूर्ण आदेशांचे पालन करणे ही परिपूर्ण भक्ती आहे. कोणत्याही भेदभाव आणि विभाजनाशिवाय पूर्ण निष्ठेने आणि खऱ्या भक्तीभावाने आणि मन:पूर्वक आज्ञापालनासह केलेली भक्ती ही 'इबादत' आहे. अल्लाहने पाठविलेला हा धर्म सर्वसमावेशक उपदेशांचा आणि आदेशांचा संग्रह आहे, हा धर्म समस्त मानवजातीसाठी आहे, हे लक्षात ठेवून इस्लामच्या संपूर्ण शिकवणीतील प्रत्येक लहानसहान बाबींसह सर्व अंमलात आणून संपूर्ण जीवनाला समर्पित केल्याशिवाय 'इबादत' परिपूर्ण होत नाही.

इस्लाम आणि पवित्र कुरआननुसार ईश्वर, धर्म आणि भक्ती यांच्या जर या व्याख्या असतील तर माणसाच्या व्यक्तिगत जीवनाशी संबंधीत गोष्टीबाबत कोणतीही चर्चा होऊ शकत नाही. चर्चा केली गेली तरी ती इस्लाम धर्म, ईश्वर भक्ती यात त्याचा समावेश होणार नाही, कौटुंबिक आणि सामाजिक बाबी यासुद्धा मानवी जीवनाचाच एक भाग आहे. मग ईशधर्म या बाबींना दृष्टीआड कसा करू शकेल? याबाबतीत उपदेश किंवा आदेश कसा न देईल? सत्य आणि न्याय यांची आवश्यकता कशी नसेल? जे आदेश किंवा उपदेश याबाबतीत दिले असतील त्यांना धार्मिक महत्त्व का नाही? त्यांचे पालन करणे सक्तीचे केले असते काय? त्याचे अंमलात आणणे किंवा न आणणे याचा मुस्लिम असणे किंवा नसणे यावर काहीच परिणाम झाला नसता काय?

ईश्वर, धर्म आणि उपासना याबाबतच्या काही लोकांच्या धारणा वेगळ्या असू शकतात. नव्हे तर अधिकांश लोकांच्या या धारणा वेगळ्याच आहेत. अशा लोकांना इस्लामी व्यक्तिगत कायद्याच्या धार्मिक प्रतिष्ठेचे आकलन होणे आणि त्यांची योग्यायोग्यता ठरविणे फारच कठीण आहे. परंतु येथे योग्यायोग्यतेचा ही प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि मूळ प्रश्न वास्तवतेचा आहे आणि वास्तवता ही आहे की हे कायदे धार्मिक प्रतिष्ठेचे असून ते धर्माचाच एक अविभाज्य भाग आहेत, यास कोणत्याही प्रकारे नाकारता येत नाही. पवित्र कुरआनची शिकवणूक, इस्लामची धर्मविषयक आणि ईश्वरविषयक धारणेशी सुसंगत असून इस्लामचे व्यक्तिगत कायदे इस्लाम धर्माचा अविभाज्य भाग आहे.

सामुदायिक आणि सांस्कृतिक महत्त्व :

मुस्लिम व्यक्तिगत कायद्याच्या प्रतिष्ठेची योग्यता आणि मौलिक महत्त्व उपरोक्त विवेचनावरून स्पष्ट झाले आहे. त्याविषयी अधिक खुलासा करण्याची आवश्यकता दिसत नाही. परंतु प्राप्त परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार, या कायद्याची धार्मिक प्रतिष्ठा तात्पुरती बाजुला ठेवून त्या कायद्याच्या केवळ सांस्कृतिक व सामुदायिक दृष्टिकोनातून त्याच्या महत्त्वाच्या बाबतीत परीक्षण करू या, जेणेकरून कोणत्याही कारणाने त्यांची धार्मिक प्रतिष्ठा समजण्यास जे असमर्थ असतील, त्यांच्याही हे लक्षात यावे की मुस्लिम आपल्या व्यक्तिगत कायद्यांना का कवटाळून बसले आहेत आणि त्यांना तसे करणे का अपरिहार्य आहे?

सांस्कृतिक आणि सामुदायिक हित दृष्टीसमोर ठेवून मुस्लिम व्यक्तिगत कायद्याचे परीक्षण केल्यास, त्याचे खालील महत्त्वाचे पैलू समोर येतात.

१. मुस्लिम पर्सनल लॉ - सामुदायिक व्यक्तिमत्त्वाचे शरीर :

मुस्लिम व्यक्तिगत कायदे मुस्लिमांच्या सामुदायिक व्यक्तिमत्त्वासाठी तितकेच आवश्यक आहेत, जितके एखाद्या जीवंत शरीरासाठी त्याच्या सर्व अवयवाची आवश्यकता असते. याचे कारण किंवा त्याच्या घटकांची सत्यता आकलन करून घेण्यासाठी एखाद्या सामुदायिक आणि सांस्कृतिक गटाच्या रचनेची बारकाईने निरीक्षण करा आणि पाहा तो कसा बनला आहे? ती कोणती विशेष तत्त्वे असतात ज्या योगे एक जनसमूह, दुसऱ्या जनसमूह आणि गटाहून वेगळे व्यक्तिमत्त्व राखणारा आणि चिरस्थायी समुदायाची योग्यता दाखवितो.

असा विचार केल्यानंतर लक्षात येते की या प्रकरणात प्रथम महत्त्व पायाभूत श्रद्धा आणि धारणांना आहे आणि तेच या समुदायाच्या वैशिष्ट्यांचे वास्तविक उगमस्थान आहे. परंतु त्याबरोबरच ते आदेश आणि कायदे अंमलात आणण्यालाही कमी महत्त्व असत नाही. या कायद्याच्या अंमलाखाली समुदायाच्या व्यक्तींची संपूर्ण आयुष्ये व्यतीत होत असतात. श्रद्धा आणि विचार डोळ्यांना दिसणाऱ्या बाबी नसल्यामुळे ते कोणत्याही समुदायाच्या व्यक्तित्वाचे सूचक किंवा चिन्हे बनू शकत नाही. व्यावहारिक दृष्टीने समुदायाची ओळख त्याच्या वैशिष्ट्यांची दर्शक चिन्हे त्यांच्या वागण्याच्या दृश्य पद्धती आणि ते कायदे व सिद्धान्त असतात. ते पायाभूत श्रद्धांनी आणि धारणांनी स्वीकारलेली असतात आणि त्यावर हुकूम त्यांच्या आयुष्याचे व्यवहार होत असतात. समाजाने अंमलात आणण्याच्या दृष्टीने आणि सर्वसाधारण आयुष्याच्या व्यावहारिक संपर्काच्या दृष्टीने हे कायदे आणि सिद्धान्त समान असत नाहीत म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या रचनेतसुद्धा त्यांची अंमलबजावणी दखल घेण्यायोग्य असू शकत नाही.

ज्या कायद्याचा संपर्क समाजातील लोकांच्या जीवनाशी अधिक असेल त्या समाजाच्या रचनेत त्या कायद्याच्या अंमलबजावणीची दखल तेवढी अधिक असेल. या दृष्टीने व्यक्तिगत कायद्याला विशेष स्थान आहे. विवाह विधी (निकाह), पत्नी व मुलांच्या अन्न वस्त्राची व्यवस्था (नफ़का), नवऱ्या मुलाने वधूस भेटीदाखल द्यावयाची रक्कम (महर), पतीकडून घटस्फोट (तलाक), पत्नीकडून घटस्फोट (खुलअ), विवाहविच्छेदन (फ़स्ख निकाह), दांपत्य अधिकार आणि कर्तव्य, वारसाहक्क, मृत्युपत्र, रज़ाअत, हजानत, किफालत इत्यादी बाबींचा आणि प्रकरणांचा व्यावहारिक संबंध समाजातील सर्व लोकांशी असतो आणि याबाबतच्या समस्यांनी समाजातील जवळजवळ सर्व व्यक्ती ग्रासलेल्या असतात. आयुष्यातील याशिवाय दुसऱ्या समस्या तुलनात्मकदृष्ट्या कमी किंवा मर्यादित प्रमाणात असतात म्हणून आयुष्यातील व्यवहार व्यवस्थित पार पाडण्यासाठी असलेल्या कायद्याचे सामुदायिक महत्त्व खूप जास्त आणि अधिक नैसर्गिक असते आणि समुदायाच्या वैशिष्ट्याचे आणि मुख्य व्यक्तिमत्त्वाचा आधार या कायद्यावर जितका असतो तितका दुसऱ्या कायद्यावर कधीही नसतो.

सर्वसाधारण परिस्थितीत हेच कायदे समाजाच्या वैशिष्ट्याचा आणि खास व्यक्तित्वाचा आरसा असतो, असे म्हणणे वावगे होणार नाही. याच कायद्यांच्या रचनेमध्ये व्यक्तित्वाचे दर्शन घडणे शक्य आहे.

२. पर्सनल लॉ समाजाच्या आत्म्याचे रक्षक :

व्यक्तिगत कायदे इस्लामी समाजाच्या सामुदायिक आत्म्याचे रक्षकसुद्धा आहेत. कारण सामुदायिक जीवन आणि मृत्यूसंबंधीच्या समस्यांमध्ये खोलात शिरून पाहिल्यास असे दिसून येईल की कोणत्याही समाजाच्या व्यक्तिगत कायद्यांच्या अस्तित्वाचा संबंध या त्यांच्या श्रद्धा आणि विचाराशी जीवन जोडले गेलेले असते. म्हणून या पायाभूत मूळ कायद्यांची अत्यंत आवश्यकता असते.

याचे उदाहरण वृक्षासारखे आहे. वृक्षाच्या फांद्या, पाने जरी मुळातून निघत असले आणि हीच मुळे त्यांना जीवन आणि हिरवेपण देत असली तरी मुळेसुद्धा आपल्या स्वत:च्या जीवनासंबंधी आणि समृद्धतेसंबंधी नि:स्पृह किंवा बेपर्वा असत नाहीत. म्हणून जेव्हा मुळे कापली जातात किंवा सुकून जातात तेव्हा फांद्या आणि पानेही सुकून जातात. त्याचप्रमाणे जर फांद्या आणि पानेही कापली गेली किंवा आगीच्या भक्ष्यस्थानी पडली तर मुळांची शक्ती आणि जिवंतपणा शिल्लक राहू शकत नाही. हळूहळू सडून तेही सुकून जातात. अगदी हीच परिस्थिती समुदायाचे विचार आणि धारणांचीसुद्धा असते. जेव्हा धारणा जीवनामध्ये अंमलात असतात तोपर्यंत या धारणांमध्येसुद्धा जीवन आणि शक्ती असते. जेव्हा या धारणा अंमलामध्ये नसतात तेव्हा धारणांच्या नाडीचे ठोके क्षीण होत जातात.

मौलिक धारणा, ज्यांच्या अंतर्गत समाज आपले जीवन व्यतीत करीत असतो, त्या अंमलात आणण्यासाठी हे सर्व कायदे आवश्यक असतात. त्यांच्या व्यक्तित्वासाठी त्यांच्या व्यक्तिगत कायद्याचे व्यावहारिक महत्त्वही सर्वांत अधिक असते. म्हणून या कायद्यामधून त्यांचा व्यावहारिक सहयोग किंवा असहयोग याचे परिणामसुद्धा त्याची आपली मौलिक धारणांची बाजू अधिक स्पष्ट होते. हे कायदे मजबुतीने अंमलात आणल्यामुळे या धारणांशी मानसिक संपर्क अवश्य शाबूत राहतो. पण जर या कायद्याशी व्यावहारिक नाते कापले गेले तर तो संपर्क कमजोर, अर्धजीवित आणि शेवटी प्राणहीन होणे क्रमप्राप्त होते. कारण या कायद्याशी सरळ नाते तोडल्याचा अर्थ असा होईल की आता ते समाजाच्या दृष्टीने योग्य आणि स्वीकारार्ह राहिले नाहीत. त्यांना अयोग्य अस्वीकारार्ह ठरविण्याचा निश्चित अर्थ हा होईल की ते ज्या पायाभूत विचार आणि धारणा अंतर्गत निर्माण झाले आहेत, मुळात त्या स्वत: धारणांची महानता आणि सत्यता आता त्यांच्याजवळ मान्यताप्राप्त आणि विश्वासार्ह राहिली नाही. दुसरे असे की त्याला आपल्या या विश्वासार्ह किंवा विश्वासाच्या कमतरतेची कारणे स्वत:लासुद्धा समजत नाही.

नंतर हे मानसिक परिवर्तन या मर्यादेपर्यंतच थांबणार नाही. उलट ते जरूर वाढत जाईल आणि समाज दुसरे विचार आणि दुसऱ्या धारणांनी प्रभावित होत जाईल. कारण जेव्हा तो (समाज)

आपल्या व्यक्तिगत कायद्याशी फारकत घेईल तेव्हा त्याची पोकळी दुसऱ्या कायद्याच्या संग्रहाशी नाते जोडण्याची आवश्यकता निर्माण होईल. हे दुसरे कायदे दुसऱ्या कोणत्यातरी धारणा आणि दृष्टिकोनावर निर्माण झालेले असतील हे स्पष्टच आहे. ज्या धारणांच्या आधारावर बनलेले व्यक्तिगत कायदे अंगीकारले आहेत खुद्द त्यांच्यासाठी त्यांच्या मनाचे दरवाजे उघडले जातील. त्यामुळे त्यांच्या आपल्या वैशिष्ट्यांचा संबंध कमकुवत होईल. म्हणून ते या हल्ल्याचा सामना करण्यास सबल असणार नाहीत. परिणामत: त्यांचा पायाभूत विचार आणि धारणा यांचा पाया निश्चित ढासळेल आणि समजून उमजून किंवा न समजता ते त्यात बदल करण्यास तयार होतील. म्हणून हे वास्तव आहे की कोणत्याही समाजाचा व्यक्तिगत कायदा हा जिथे त्यांच्या व्यक्तित्वाचे शरीर असतो तेथे त्यांच्या आत्म्याचा रक्षकही असतो. राष्ट्राच्या आणि समाजाच्या इतिहासात या बाबींचे पुरावे भरपूर आढळतात. खुद्द इस्लामी समुदायाच्या इतिहासातसुद्धा पुरावे उपलब्ध आहेत.

३. व्यक्तिगत कायद्याला वंचित होणे म्हणजे सामाजिक व्यक्तिमत्त्वाचा मृत्यू ओढवणे :

आपल्या व्यक्तिगत कायद्याला वंचित झाल्यामुळे समाजाचे व्यक्तित्व कोणत्याही प्रकारे जीवंत राहू शकत नाही. कारण व्यक्तिगत कायद्याचे महत्त्व त्या जमातीच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा सांगाडा असतो आणि त्याच्या आत्म्याचा रक्षकही असतो. त्यालाच तो वंचित झाल्याने त्याचे व्यक्तित्व शिल्लक राहत नाही. यावर कोणत्याही युक्तिवादास वाव नाही. ही वंचितता म्हणजे त्या जमातीचे अस्तित्व नाकारणे आहे. म्हणून त्यांचा व्यक्तिगत कायदा समाप्त करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या खास निशाण्या आणि रुपरेषा मिटवून त्यास दुसऱ्या शरीरात प्रविष्ठ करण्यास भाग पाडणे, असा याचा अर्थ होतो. या परिवर्तनामुळे त्यांची वैचारिक आणि काल्पनिक मुळे उखडली गेल्यामुळे कमजोर होतील आणि शेवटी यापुढे त्याचे नियमानुसार जीवंत राहणे संभवनीय असेल का?

या क्रांतीनंतर दुसऱ्या कोणत्यातरी सांस्कृतिक समूहात, पावसाच्या थेंबाप्रमाणे सामावून जाणे हेच त्याच्या नशिबी असेल. या समाजाचे किंवा धर्माचे लोकसुद्धा शिल्लक राहणार नाहीत, असा याचा अर्थ नाही, ते शिल्लक राहतील आणि हेही शक्य असेल की ते आपल्या जीवनात प्रगतीवर प्रगती करीत जातील तथापि त्या धार्मिक समूहाचे आणि समाजाचे नाव पुसले जाईल. या धार्मिक समूहाचे लाखो करोडो लोक उपलब्ध असताना त्यांच्या स्वत:च्या व्यक्तित्वाच्या कथा मात्र भूतकाळ बनून राहतील.

व्यक्तिगत कायद्याची समाप्ती करणे हे एक धोकादायक पाऊल ठरेल :

जमाती आणि धर्मांच्या व्यक्तिगत कायद्यांना असाधारण महत्त्व असते, त्यामुळेच कोणत्या जमातीला किंवा धर्माला त्यात स्वाभिमान आणि स्वत:ला ओळखण्याची थोडीतरी क्षमता असते. आपला व्यक्तिगत कायदा त्यांना प्राणापेक्षा प्रिय असतो आणि कोणतीही किंमत देऊन त्याचे रक्षण ते करू इच्छितात. त्यांना त्या कायद्याशी सैध्दान्तिक नाते तर असतेच, शिवाय

तीव्र भावनात्मक संबंधसुद्धा असतात. त्या भावना फार नाजुक असतात. त्यांचा नायनाट किंवा त्यांना संपविण्याचा प्रयत्न त्या समाजाला सहन होणे शक्य नाही.

दुसऱ्या कोणत्याही बाबीपासून वंचित होण्यास तो समाज सहन करील परंतु अशा सैद्धान्तिक आणि भावनात्मक बाबींपासून दुरावण्याचा विचारसुद्धा तो समाज करू शकत नाही. याच कारणामुळे भूतकाळातील महान आणि शक्तिशाली साम्राज्यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या प्रजेकडून सर्व काही हिसकावून घेतले तथापि व्यक्तिगत कायद्यांना हात लावण्याची हिंमत त्यांनी केली नाही.

रशियन साम्राज्य आणि ब्रिटिश साम्राज्य यांची उदाहरणे अगदी जाहीर आहेत. ब्रिटिशांनी भारतावर शासकीय कब्जा केल्यावर, त्या काळात भारतात जे इस्लामी कायदे लागू होते ते हळूहळू समाप्त करून त्यांनी बनविलेले कायदे लागू केले. तथापि येथील नागरिकांचे व्यक्तिगत कायदे रद्द केले नाहीत. कारण येथील मुस्लिमांचे आणि हिंदूंचे आपापल्या व्यक्तिगत कायद्याशी तीव्र भावनात्मक संबंध आहेत आणि त्यासाठी ते आपले प्राण त्यागही करतील, परंतु आपापल्या या कायद्यांना रद्दबातल करणे ते कधीही सहन करणार नाहीत, या वस्तुस्थितीची त्यांना जाणीव होती. म्हणून या नाजुक भावनांशी छेडछाड करणे म्हणजे त्यांच्यावर अत्यंत हानिकारक परिणाम होतील हे ते जाणून होते.

आतापर्यंत जे वास्तव आहे ते आज अवास्तव होऊ शकत नाही. व्यक्तिगत कायद्याचे हे महत्त्व इतर जमाती आणि धर्मांच्या बाबतीतही नाकारणे योग्य नाही, त्याचप्रमाणे इस्लामी समुदायासंबंधीसुद्धा नाकारणे योग्य होणार नाही. मुस्लिमांचा व्यक्तिगत कायदा त्यांच्या व्यक्तित्वासाठी शरीर आणि त्याच्या समुदायासाठी आत्म्यांची भूमिका राखून आहे आणि त्यापासून वंचित होण्याचा परिणाम त्यांच्या सामुदायिक मृत्यूच्या स्वरुपात समोर येतो. म्हणून जरी त्यांचे नाते धर्म आणि श्रद्धा यांच्याशी जोडलेले नसते तरी हे त्यांच्यासाठी प्राणापेक्षा कमी प्रिय राहिले नसते.

-०- समाप्त -०-